# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १५५व्या बैठकीचे कार्यवृत्त

**दिनांक : १२ डिसेंबर, २०२३ (मंगळवार)**
**वेळ : सायंकाळी ०५.०० वाजता**
**स्थळ : मा. मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष, रामगिरी, नागपूर.**

**उपस्थित सदस्य :**

श्री. एकनाथ शिंदे - अध्यक्ष
माननीय मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री

श्री. मनोज सौनिक - सदस्य
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

श्रीमती वल्सा नायर सिंग - सदस्य
अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग

श्री. असीम गुप्ता - सदस्य
प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग

डॉ. संजय मुखर्जी - सदस्य-सचिव
महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**विशेष निमंत्रित :**

श्री. भूषण गगराणी
अपर मुख्य सचिव,
मा. मुख्यमंत्री

**निमंत्रित :**

श्री. प्रकाश निकम
अध्यक्ष,
पालघर जिल्हा परिषद (दूरचित्र संवादाद्वारे)

श्री. मनुज जिंदल
प्रशासक,
पालघर जिल्हा परिषद (दूरचित्र संवादाद्वारे)

डॉ. भरत बास्टेवाड
प्रशासक,
रायगड जिल्हा परिषद (दूरचित्र संवादाद्वारे)

श्री. अनिल गायकवाड
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (दूरचित्र संवादाद्वारे)

बैठकीच्या सुरुवातीस माननीय मुख्यमंत्री व नगर विकास मंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांचे महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या वतीने स्वागत केले.

श्री. अतुल सावे, मा. मंत्री, गृहनिर्माण आणि श्री. अनिल डिग्गीकर, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचे 'पदसिध्द सदस्य' तसेच डॉ. के.एच.गोविंदराज, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांचे 'निमंत्रित सदस्य' म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री व तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांनी प्राधिकरणाचे 'पदसिध्द सदस्य' श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास, तत्कालीन महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी प्राधिकरणाचे 'पदसिध्द सदस्य-सचिव' आणि डॉ. सोनिया सेठी, तत्कालीन प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी 'निमंत्रित सदस्य' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

त्यानंतर विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक १० मार्च, २०२३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१५४व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक १० मार्च, २०२३ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१५४व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ : प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीचे विल्हेवाटीसाठी निविदा मागविण्याबाबत**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**<u>ठराव क्र.१६५९ :</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, प्राधिकरणाच्या मालकीच्या भूखंडाचे विल्हेवाटीबाबत निविदा प्रक्रिया जलदगतीने राबवून प्राधिकरणाने हाती घेतलेल्या महात्वाकांक्षी प्रकल्पांच्या

पूर्णत्वासाठी तातडीने निधी उभारण्यासाठी निविदा मागविणे व निविदा प्रक्रिया राबविण्याचे सर्व अधिकार महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर निविदा प्रक्रियेवेळी बाजाराच्या परिस्थितीनुसार निविदा उचित वेळी मागविणे, एका वेळी किती भूखंडाच्या निविदा मागवायच्या याचा निर्णय घेणे, प्राधिकरणाच्या प्रचलित निविदेच्या अटी व शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करणे, आवश्यकतेनुसार सल्लागाराची नियुक्ती करणे व वरील प्रस्तावाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास याद्वारे मान्यता देत आहे.

**"आणखी असा करण्यात येत आहे की,** भूखंड विल्हेवाटीबाबतची निविदा प्रक्रिया जलदगतीने राबवून यशस्वी निविदाकारास प्राधिकरणाच्या मान्यतेने देकार पत्र देण्यात येईल यासदेखील याद्वारे मान्यता देत आहे".

**बाब क्र.४:** **'बॅकबे रिक्लेमेशन स्कीम' मधील ब्लॉक - III ते VI (BBRS) च्या मंजूर विकास योजनेची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३८ अन्वये फेरतपासणी (Revision) करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम २३ ते ३० मधील कार्यवाही करण्यास प्राधिकरणाची मान्यता मिळणेबाबत. (Revision of D.P.)**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६६०:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** शासनाने दिनांक १४/१०/२०२२ व दिनांक २०/०३/२०२३ रोजीच्या अधिसुचनेद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेस (बॅकबे रिक्लेमेशन स्किम ब्लॉक III ते VI या क्षेत्रासाठी) नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे. तसेच, शासनाने दिनांक २०/०३/२०२३ रोजीच्या अधिसुचनेनुसार प्राधिकरणास सदर क्षेत्रातील विकास आराखड्याच्या फेरतपासणी करण्यासंबंधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने, बॅकबे रिक्लमेशन स्कीममधील ब्लॉक क्र. III ते VI च्या मंजूर विकास आराखड्याची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३८ अन्वये फेरतपासणी (Revision) करण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २३ ते ३० मधील विकास योजना तयार करण्यासंबंधीची वैधानिक कार्यवाही करण्याकरीता आवश्यक ती फेरतपासणी प्रक्रीया पूर्ण करून शासनास मंजुरीसाठी सादर करण्यास प्राधिकरण मान्यता देतआहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे कि,** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ कलम ३८ अन्वये फेरतपासणी (Revision) करण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २३ ते ३० अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास साहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वरीलप्रमाणे विकास योजना तयार करण्यासंदर्भात उक्त अधिनियमातील कलम ३८ अन्वये फेरतपासणी (Revision) करण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २३ ते ३० अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन, शासनास मंजुरीसाठी सादर करण्यासाठी, तसेच फेरतपासणी करण्यासंबंधी लागणाऱ्या इतर आवश्यक सर्व बाबींसाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३९ अन्वये तसेच मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७-अ व १२ (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे कि,** उपरोक्त अनुषंगाने अधिनियमानुसार आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पूर्ण करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.५ : प्रवर्तन निदेशालय (Enforcement Directorate), भारत सरकार यांना मुंबईमध्ये कार्यालयासाठी वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-ब्लॉक मधील वाणिज्य वापराच्या सी-३५ सी (C-३५C) या भूखंडाचे वाटप करण्याबाबत प्राधिकरणाने दिलेल्या देकार पत्रास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत तसेच अधिमूल्य भरण्यासाठी वेळोवेळी दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मंजुरी मिळणे तसेच दिनांक ३०/०३/२०२४ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६६१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, वांद्रे-कुर्ला संकुलातील जी ब्लॉकमधील भूखंड क्र.सी-३५सी (भूखंड क्षेत्र २२०० चौ.मी. व अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र १०,५०० चौ.मी.) हे "प्रवर्तन

निदेशालय (Enforcement Directorate), भारत सरकार " यांना प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी वाटप करण्यास याद्वारे कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रवर्तन निदेशालय (Enforcement Directorate), भारत सरकार यांच्या एकात्मिक कार्यालयासाठी बांधकाम क्षेत्राची आवश्यक लक्षात घेता, भूखंड क्र. "सी-३५सी" वरील "वास्तुशास्त्रीय नियंत्रणे" (Architectural Controls) शिथिल करून सदर भूखंडांचा "विकास प्रचलित विकास नियंत्रण नियमावली" नुसार अनुज्ञेय करण्यास याद्वारे कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी' ब्लॉकमधील वाणिज्य वापरासाठीच्या भूखंड क्र. सी-३५सी हा भूखंड ४५ मी रुंद वांद्रे-कुर्ला जोडरस्त्यालगत जरी असला तरी सदर रस्ता भूखंडासाठी वाहनाच्या प्रवेश मार्गीकेसाठी (Access Road) वापरता येणार नाही व त्यासाठी दक्षिण बाजूकडील १८ मी. रुंद रस्ता वापरता येऊ शकेल यास याद्वारे कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील वाणिज्य भूखंड देकारद्वारे वाटपासाठी सध्याचा अधिमूल्याचा दर रु. ३,४४,५००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र यास प्राधिकरणाने दि.२० ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या १५३ व्या बैठकीमधील ठराव क्र. १६१७ अन्वये मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या बांधकाम क्षेत्राच्या उपरोक्त दराने "प्रवर्तन निदेशालय (Enforcement Directorate), भारत सरकार " यांना प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी भूखंड वाटप करण्यास याद्वारे कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** वरीलप्रमाणे प्रवर्तन निदेशालय (Enforcement Directorate), भारत सरकार यांच्या दिनांक २४ एप्रिल, २०२३ च्या विनंतीस अनुसरून वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी' ब्लॉकमधील वाणिज्य वापरासाठीच्या भूखंड क्र. सी-३५सी (भूखंड क्षेत्र २२०० चौ.मी. व अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र १०,५०० चौ.मी.) या भूखंडाचे प्रवर्तन निदेशालय यांना बाब टिप्पणीतील परिच्छेद ५.४.७ मधील तक्ता -अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे (एकूण अधिमूल्य रु.३६१.७३ कोटी) वाटप करण्यास याद्वारे कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"त्यापुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील वाणिज्य वापरासाठीच्या भूखंड क्र. सी-१३ व सी-१९ या भूखंडाचे ई-निविदेद्वारे वाटप करण्यास प्राधिकरणाच्या दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या १५४ व्या बैठकीमधील ठराव क्र. १६४८ अन्वये

मान्यता देण्यात आली असून त्याप्रमाणे प्राधिकरणाने दि. १५ मे, २०२३ रोजी ई-निविदा प्रसिद्ध केली आहे. सबब सदर ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी प्रवर्तन निदेशालय (Enforcement Directorate), भारत सरकार यांनी वरील नमूद प्रस्तावित भाडेपट्टा अधिमूल्य न भरल्यास, प्राधिकरणास सदर ई-निविदेद्वारे प्राप्त बांधकाम क्षेत्राचा सुधारित वाढीव दर प्रवर्तन निदेशालय (Enforcement Directorate), भारत सरकार यांच्या भूखंड वाटपासाठी लागू राहील यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"आणखी पुढे असा ठराव करण्यात येत आहे कि,** प्रवर्तन निदेशालय (Enforcement Directorate), भारत सरकार यांना प्राधिकरणाने दि. ३० मे, २०२३ रोजी दिलेल्या देकार पत्रास कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"आणखी पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रवर्तन निदेशालय (Enforcement Directorate), भारत सरकार यांच्या दिनांक १० जुलै, २०२३ रोजीच्या विनंती अनुषंगाने प्राधिकरणाने दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजीचे पत्राने विषयांकित भूखंडाच्या ३०% चा पहिला हप्ता भरण्यास दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्या विनाव्याज मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"त्यापुढे असा देखील ठराव करण्यात येत आहे कि,** प्रवर्तन निदेशालय (Enforcement Directorate), भारत सरकार यांनी दि. २७ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्राने प्राधिकरणास ६ महिन्यांची मुदतवाढ देण्यास विनंती केली आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या जमिन विल्हेवाट अधिनियम, १९७७ च्या कलम १६ अन्वये, केंद्र शासनाच्या संस्थेस केंद्र शासनाच्या वित्त विभागाकडून (DOR) सदर अधिमूल्य मंजूर करण्यास लागणारा कालावधी लक्षात घेता या वाढीव कालावधीसाठी भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणास भरणा करण्याच्या कालावधीत ६ महिने विनाव्याज मुदतवाढीस (३०/०९/२०२३ ते ३१/०३/२०२४) मान्यता देत आहे.

**"त्यापुढे असाही देखील ठराव करण्यात येत आहे कि,** याबद्दलची सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देत आहे".

**बाब क्र.६ : नॅशनल इनव्हेस्टीगेशन एजन्सी (National Investigation Agency) या संस्थेस त्यांच्या कार्यालयीन इमारतीसाठी वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-ब्लॉकमधील वाणिज्य वापराच्या सी-३५बी (C-३५B) या भूखंडासाठी प्राधिकरणाच्या मान्यतेने दिलेल्या देकारानुसारचे अधिमुल्य भरण्यासाठी वेळोवेळी दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मंजुरी मिळणे तसेच दिनांक ३०/०३/२०२४ पर्यंत मूदतवाढ मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

<u>ठराव क्र.१६६२ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा व त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन तसेच, प्राधिकरणाचे (जमीन विल्हेवाट) विनियम, १९७७ मधील नियम ४ (iii) चा वापर करुन बाब टिप्पणीतील नॅशनल इनव्हेस्टीगेशन एजन्सी (NIA) या संस्थेस प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२२ रोजी वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील वाणिज्य वापराचा भूखंड क्र. सी-३५ बी, साठी क्षेत्रफळ १,५०० चौ.मी. व ६,००० चौ.मी. एवढे अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रासह रु. ३,४४,५००/- प्रति चौ. मी. बांधकाम क्षेत्र या दराने देकार पत्र दिले असून नॅशनल इनव्हेस्टीगेशन एजन्सी (NIA) यांच्या बाब टिप्पणीत वेळोवेळी नमुद केलेल्या विनंतीनुसार सदर भूखंडांच्या अधिमूल्याची रक्कम भरण्याबद्दल त्यांचे स्तरावर सकारात्मक कार्यवाही चालू आहे. सबब, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमीन विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या नियम १६ अन्वये प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या एकुण अधिमूल्याच्या ३०% चा पहिला हप्ता भरण्याच्या वाढीव कालावधीस (सध्याच्या अंतिम दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२३) पर्यंत प्राधिकरण विनाव्याज मुदतवाढीस कार्योत्तर मंजुरी देत आहे. तसेच, केंद्र शासनाच्या संस्थेस केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडुन सदर अधिमूल्य मंजुर करण्यास लागणारा कालावधी लक्षात घेता या वाढीव कालावधीसाठी भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणास भरणा करण्याच्या कालावधीत अंदाजे ५ महिने वाढीस **(०९/११/२०२३ ते ३१/०३/२०२४)** विनाव्याज मुदतवाढीस मंजुरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाने सी-१३ व सी-१९ या वांद्रे-कुर्ला संकुलाच्या जी- ब्लॉक मधील वाणिज्य भूखंडाच्या वाटपासाठी प्राधिकरणाने (नॅशनल इनव्हेस्टीगेशन एजन्सी (NIA) ला देकार दिलेल्या) रू.३,४४,५००/- या राखीव दराने ई-निविदा मागविल्या असून नॅशनल इनव्हेस्टीगेशन एजन्सी (NIA) यांनी प्राधिकरणाचा देकार स्विकारून अधिमुल्याचा ३०%

चा पहिला हप्ता भरणे पूर्वी जर सदर निविदेद्वारे नॅशनल इनव्हेस्टीगेशन एजन्सी (NIA) यांना कळविलेल्या दरापेक्षा जास्त दर प्राधिकरणास मिळाल्यास यापैकी अधिकतम दर नॅशनल इनव्हेस्टीगेशन एजन्सी (NIA) च्या भूखंड वाटपासाठी लागू राहिल यासदेखिल प्राधिकरण कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** याबद्दलची सर्व आवश्यक ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे."

**बाब क्र.७ : आयकर विभागास (Income Tax) त्यांच्या कर्मचारी वसाहत (Staff Quarters) इमारतीसाठी वांद्रे-कुर्ला संकुलातील जीएन ब्लॉकमधील रहिवासी वापराच्या आर-१ (R-१) या भूखंडासाठी प्राधिकरणाच्या मान्यतेने दिलेल्या देकारानुसारचे अधिमूल्य भरण्यासाठी वेळोवेळी दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मंजुरी मिळणे तसेच दिनांक ३०/०३/२०२४ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

ठराव क्र.१६६३ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोट कलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा व त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन तसेच, प्राधिकरणाचे (जमीन विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या नियम ४(iii) चा वापर करुन बाब टिप्पणीत नमुद केल्याप्रमाणे आयकर विभागाच्या विनंतीनुसार वांद्रे कुर्ला संकुलातील "जी-एन्" ब्लॉक मधील रहिवासी वापराचा भूखंड क्र. आर-१, क्षेत्रफळ २१,८०७.९७ चौ.मी. व ८०,०००.०० एवढे अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रासह आयकर विभागास रु. ३,५२,००८/- प्रति.चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने वाटप करण्यास प्राधिकरणाने दिलेल्या मान्यतेनुसार दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ रोजी देकार पत्र दिले असून आयकर विभागाच्या बाब टिपणीत नमुद केल्यानुसार वेळोवेळी केलेल्या विनंती नुसार सदर भुखंडाच्या अधिमुल्याचा भरणा करणेबाबत त्यांचे स्तरावर सकारात्मक कार्यवाही चालु आहे. सबब, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमीन विल्हेवाट) विनियम– १९७७ च्या नियम १६ अन्वये प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या एकूण अधिमुल्याचा ३०% चा पहिला हप्ता भरण्याच्या वाढीव कालावधीस (सध्याच्या अंतिम दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत) प्राधिकरण विनाव्याज मुदतवाढीस कार्योत्तर मंजूरी देत आहे. तसेच, केंद्र

शासनाच्या संस्थेस केंद्र शासनाच्या वित्त विभागाकडुन सदर अधिमूल्य मंजुर करण्यास लागणारा कालावधी लक्षात घेता या वाढीव कालावधीसाठी भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणास भरणा करण्याच्या कालावधीत ६ महिने विनाव्याज मुदतवाढीस (दि. ३०/०९/२०२३ ते ३१/०३/२०२४) मंजुरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाने वांद्रे कुर्ला संकुलाच्या जी ब्लॉक मधील रहिवासी वापराच्या इतर भुखंडाचे निविदेव्दारे वाटप करण्याचा निर्णय घेतला असून सदर निविदेत (आयकर विभागास देकार दिलेल्या दरापेक्षा) जास्त दर प्राप्त झाल्यास तो आयकर विभागास लागु असेल यास देखिल मंजूरी देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** याबद्दलची सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे".

**बाब क्र.८ :- बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील शासनाच्या दुग्ध विकास विभागाच्या ताब्यात असलेल्या**

**अ. मौजे कुर्ला येथील भूमापन क्र.२२९/१/१, नगर भुमापन क्र.२ येथील सुमारे १०.४६ हे भूखंड**

**ब. मौजे वरळी येथील भूमापन क्र. ८६६/५, ८६६/७ व इतर सुमारे ६.४ हे भूखंड प्राधिकरणास विनामोबदला, बोजारहित व भोगवटादार वर्ग-१ धारण पद्धतीने हस्तांतरित करून सदर भूखंडासाठी प्राधिकरणाची "प्रकल्प अंमलबजावणी संस्था" व "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्याबाबत शासनास विनंती करणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६६४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) व कलम १२ (इ) तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६चे कलम ४० (१) (क) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील शासनाच्या दुग्ध विकास महामंडळाचा मौजे कुर्ला येथील भूमापन क्र.२२९/१/१, नगर भुमापन क्र.२ सुमारे १०.४६ हे. भूखंड प्राधिकरणास विनामोबदला, बोजारहित व भोगवटादार वर्ग-१ धारण पद्धतीने हस्तांतरित करून सदर भूखंडासाठी प्राधिकरणाची **"प्रकल्प अंमलबजावणी संस्था** व **'विशेष नियोजन प्राधिकरण"** म्हणून नियुक्ती करण्यास शासनास विनंती करण्यास मंजुरी देत आहे. तसेच, सदर भूखंडासंबंधी यानंतराच्या व्यवहारासाठी शासनाची/ जिल्हाधिकारी यांचे परवानगीची

..९..

आवश्यकता असणार नाही तथा कुठलीही अनर्जित रक्कम आकारण्यात येणार नाही, यास देखील मंजुरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील शासनाच्या दुग्ध विकास महामंडळाचा मौजे वरळी येथील भूमापन क्र. ८६६/५, ८६६/७ व इतर सुमारे ६.४० हे भूखंड प्राधिकरणास विनामोबदला, बोजारहित व भोगवटादार वर्ग-१ धारण पद्धतीने हस्तांतरित करून सदर भूखंडासाठी प्राधिकरणाची **"प्रकल्प अंमलबजावणी संस्था व 'विशेष नियोजन प्राधिकरण"** म्हणून नियुक्ती करण्यास शासनास विनंती करण्यास मंजुरी देत आहे. तसेच, सदर भूखंडासंबंधी या नंतरच्या व्यवहारासाठी शासनाची/ जिल्हाधिकारी यांचे परवानगीची आवश्यकता असणार नाही तथा कुठलीही अनर्जित रक्कम आकारण्यात येणार नाही, यास देखील मंजुरी देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणामार्फत दुग्ध विकास महामंडळाच्या मालकीच्या सदर भूखंडावर उच्च घनतेचा मिश्र वापर विकास प्रस्तावित करून सदर क्षेत्रामध्ये रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करता येतील व याबाबतचा **आयकॉनिक प्रकल्प राबिवण्याचा** सविस्तर नियोजन प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल यासाठी शासनास विनंती करण्यास मंजुरी देत आहे.

**"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर भूखंडाचा विकास करण्यासाठी प्राधिकरणाची शासनाकडून विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती झाल्यानंतर सदर क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये नियोजन प्रस्ताव बनविणेबाबत कार्यवाही करणे, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली तयार करणे, जमिनीच्या विल्हेवाटाबाबत धोरण ठरविणे व वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मंजूरी देत आहे".

**बाब क्र.९ :- मुंबई महानगर प्रदेशामधील मुंबई पारबंदर प्रकल्प प्रभाव क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नवनगर विकास प्राधिकरण (NTDA) म्हणून नियुक्ती करणेकरिता शासनास विनंती करणेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६६५:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ (इ) अन्वये प्राप्त झालेल्या व त्यास यासंबंधी सहाय्यभूत होणाऱ्या

इतर सर्व अधिकारांचा वापर करून मुंबई पारबंदर प्रकल्प प्रभाव क्षेत्र म्हणजेच बाब टिप्पणी सोबतच्या जोडपत्र-७ मधील यादीतील १२४ गावांमधील अंदाजे ३२३.४४ चौ. किमी. क्षेत्राकरिता (ज्यामधील वन जमीनींचे क्षेत्र व किनारपट्टी विनियम क्षेत्र (Coastal Regulation Zone) तसेच पेण नगरपरिषद हद्दी भोवतालचे २५० मी. परिसरातील क्षेत्र यांकरिता नव नगर विकास प्राधिकरण (NTDA) च्या तरतुदी लागू असणार नाहीत) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास नव नगर विकास प्राधिकरण (NTDA) म्हणून नियुक्ती करणेबाबत शासनास विनंती करण्याच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाने वरीलप्रमाणे कार्योत्तर मंजूरी दिलेल्या प्रस्तावित नव नगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील शासकीय जमीनी विकासाकरिता वर्ग-१ मालकी स्वरूपात प्राधिकरणास हस्तांतरित करणेबाबत शासनास विनंती करण्याच्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाने वरीलप्रमाणे ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी उपरोक्त प्रस्तावित नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्राच्या प्रस्तावामध्ये योग्य ते बदल करणे, सिमांकन निश्चित करणे, इ. बाबत आवश्यक ते निर्णय घेणे आणि यासाठीची सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येतो की,** वरीलबाबत पुढील सर्व कार्यवाही करणे तसेच प्रस्तावित नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्राचा विकास सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१० : मे. लोकमत मिडीया प्रा.लि. यांच्यातर्फे महाराष्ट्रात पुढील काही महिन्यांत आयोजित होणा-या कार्यक्रम / उपक्रमांसाठी एकूण रु.१० कोटी + जीएसटी इतक्या रक्कमेचे प्रायोजकत्व प्राधिकरणाने स्विकारण्यास मान्यता मिळणेबाबत**

१०.१ प्राधिकरणाने उपरोक्त विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्याचे आदेशित केले.

**बाब क्र.११ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या बृहन्मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील विविध विशेष नियोजन क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या विकास प्रस्तावां संदर्भात भरावयाचे अधिमूल्य हप्त्याने भरण्याची सुविधा मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६६६ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोट कलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या 'कलम (२२ म) अंतर्गत व त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन शासनाच्या दिनांक ०३ मे, २०२३ रोजीच्या आदेशानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमधील विशेष नियोजन क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या विकास प्रस्तावां संदर्भात आवश्यक अधिमूल्य हप्त्याने व्याजा सकट भरण्याची सुविधा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या परिपत्रकातील अटी व तरतुदींच्या अधीन राहून दिनांक ०३ सप्टेंबर, २०२५ पर्यंत लागू करण्यास मान्यता देत आहे."

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : घाटकोपर, भूकर क्र. १९४ (भाग) व१९५ (भाग) रमाबाई आंबेडकर नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्राधिकरणामार्फत विकासक म्हणून राबविण्यास मान्यता देण्याबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६६७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण घाटकोपर (पू), मुंबई येथील भूकर क्र.१९४ (भाग) व १९५ (भाग) या जमिनीवरील रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याकरीता संयुक्त भागीदारी तत्वावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकासक म्हणून राबविण्यास मान्यता देत आहे".

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर योजनाची अंमलबजावणी करण्यासाठी खालील बाबींना मान्यता देत आहे :

(१) घाटकोपर (पू), मुंबई येथील भू. क्र. १९४ (भाग) व १९५ (भाग) या जमिनीवर स्थित रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टी पुनर्वसन योजना ही प्राधिकरणमार्फत विकासक म्हणून संयुक्त भागीदारी तत्वावर राबविणे व त्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करणे.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची हद्द निश्चीत करणे व त्यामध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करणे व त्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करणे.

(३) वास्तुविशारद, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व कंत्राटदार यांची नेमणूक करणे व त्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करणे.

(४) सदर योजना राबविण्याकरीता विविध वित्तीय संस्था / बँके / शासनाकडून निधी उपलब्ध करणे व त्यासाठी वित्तीय सल्लागार यांची नेमणुक करणे व त्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करणे.

(५) सदर योजनेतून उपलब्ध होणाऱ्या विक्री घटकातील सदनिका खुल्या बाजारात विक्री करणे व त्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करणे.

(६) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सदर योजनेतील विक्री घटकातील सदनिका आवश्यक असल्यास, प्रति सदनिकेचा दर निश्चित करुन त्याबाबतचा करार करणे व महानगरपालिकेकडून अग्रीम रक्कम स्वीकारणे व त्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करणे.

(७) सदर योजनेमधुन उपलब्ध होणारा विकास अधिकार व विक्री घटकातील जमीन खुल्या बाजारात विक्री करणे व त्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करणे.

(८) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडपट्टीधारकांना पुनर्वसित करेपर्यंत घर भाडे देणे व त्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करणे.

(९) सदर योजनेची अंमलबजावणीकरीता आवश्यक असल्यास विशेष हेतु वाहन (Special Purpose Vehicle - SPV) स्थापन करणे व त्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करणे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अमंलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही योग्य त्या फेरबदलांसह करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१३ : मुंबई शहरातील ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरिन ड्राईव्ह सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान वाहतुकीसाठी भुयारी मार्ग प्रकल्पासाठी निधी/कर्ज उभारणेबाबत कार्योत्तर मंजूरी.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

<u>ठराव क्र.१६६८:</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह, सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान भूयारी मार्गाचे बांधकाम प्रकल्पासाठी एकूण प्रकल्प खर्च रु.९१५८ कोटी इतक्या रक्कमेच्या २०% अंशदान व ८०% कर्ज या प्रमाणात निधी, - मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग व राज्य शासनाचा सहभाग (दुय्यम कर्ज) रु.१८३२ कोटी आणि बाह्य कर्ज सहाय्य २५ वर्षासाठी (RTL- Rupee Term Loan) रु.७३२६ कोटी उभारण्याकरीता कार्योत्तर मंजूरी देण्यात येत असून राज्य शासनाच्या सहभागाकरीता प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. एमआरडी-३३२२/प्र.क्र.८३/नवि-७ दि.१७/०८/२०२२ नुसार प्राधिकरणाचे महत्वाकांक्षी प्रकल्प (चालू व प्रस्तावित) पूर्ण करण्यासाठी प्राधिकरणास आवश्यकतेनुसार रु.६०,००० कोटी पर्यंतचे कर्ज उभारण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. त्यापैकी मे.आर.ई.सी. लि. यांच्याकडून मेट्रो प्रकल्पासाठी रु. ३०,४८३ कोटी कर्ज घेण्यात येत आहे. उर्वरित मंजूर कर्ज रक्कमेपैकी ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह, सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान भूयारी मार्गाचे बांधकाम प्रकल्पासाठी रु. ७,३२६ कोटी २५ वर्षासाठी कर्ज उभारण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर कर्जाच्या मुद्दलाच्या परतफेडीची व त्यावरील व्याजाची शासन हमी घेण्याचा प्रस्ताव राज्य शासनास पाठविण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** तसेच सदर प्रकल्प कर्जाची परतफेड टोल आकारुन /मुंबई पारबंदर जोडरस्त्याच्या टोलमध्ये वाढ करून/मुंबई एंट्री पॉईंट टोल, इत्यादी उत्पन्नातून करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"पुढे असा असा ठराव करण्यात येत आहे की,** ऑरेंज गेट, पूर्व मुक्त मार्ग ते मरीन ड्राईव्ह, सागरी किनारा मार्गाच्या दरम्यान भूयारी मार्ग बांधकाम प्रकल्पाकरीता निधी उभारण्यासाठी

बँका/वित्तीय संस्था यांजकडून कर्ज घेण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ : ठाणे ते बोरीवली जुळया टयूब भुयारी (Twin Tunnel) मार्गाच्या बांधकामाकरीता कर्ज /निधी उभारण्यासाठी कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**<u>ठराव क्र.१६६९:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** ठाणे ते बोरीवली पर्यंत भुयारी मार्गाचे बांधकाम प्रकल्पासाठी एकूण प्रकल्प खर्च रु.१८,८३८.४० कोटी इतक्या रक्कमेच्या २०% अंशदान व ८०% कर्ज याप्रमाणात निधी, - मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग रु. २,०५०.४० कोटी राज्य शासनाचा सहभाग (दुय्यम कर्ज) रु.१,७१७ कोटी आणि बाह्य कंर्ज सहाय्य २५ वर्षासाठी (RTL- Rupee Term Loan) रु. १५,०७१ कोटी, उभारण्याकरीता कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. तसेच राज्य शासनाच्या सहभागाकरीता (दुय्यम कर्ज) प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** ठाणे ते बोरीवली पर्यंत भुयारी मार्ग बांधकाम प्रकल्पाचा खर्च विचारात घेता याकरीता विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) कंपनी स्थापन करून हा प्रकल्प राबविणे करिता सल्लागाराची नेमणूक करण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सल्लागाराच्या अभिप्रायानुसार विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) कंपनी अथवा इतर पर्यायांचा विचार करून त्यामार्फत प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. विशेष उद्देश वाहन कंपनी / इतर पर्याय अंतिम होईपर्यंत करण्यात येणारा खर्च तद्नंतर विशेष उद्देश वाहन कंपनीकडे वर्ग करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** ठाणे ते बोरीवली पर्यंत भुयारी मार्गाचे बांधकाम प्रकल्पाची विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) कंपनी / इतर पर्यायाद्वारे अंमलबजावणी, निधी उभारणी इत्यादींसाठी आणि महाराष्ट्र शासन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व MMRDA INFRA LIMITED - विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle)

यांच्यामध्ये करारनामा करण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. याकरीता शासनाची मान्यता घेण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर विशेष उद्देश वाहन कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महानगर आयुक्त असतील व इतर संचालकामध्ये अति. महानगर आयुक्त, प्रमुख / मुख्य अभियंता, वित्तीय सल्लागार, विधी सल्लागार यांचा समावेश करण्याचे तसेच यात आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. एमआरडी-३३२२/प्र.क्र.८३/नवि-७ दि.१७/०८/२०२२ नुसार प्राधिकरणाचे महत्त्वाकांक्षी प्रकल्प (चालू व प्रस्तावित) पूर्ण करण्यासाठी प्राधिकरणास आवश्यकतेनुसार रु.६०,००० कोटी पर्यंतचे कर्ज उभारण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. त्यापैकी मे.आर.ई.सी. लि. यांच्याकडून मेट्रो प्रकल्पासाठी रु. ३०,४८३ कोटी कर्ज घेण्यात येत आहे. उर्वरित मंजूर रक्कमेपैकी ठाणे ते बोरीवली पर्यंत भुयारी मार्गाचे बांधकाम प्रकल्पासाठी रु.१५,०७१ कोटी २५ वर्षासाठी कर्ज उभारण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** तसेच कर्जाच्या मुद्दलाच्या परतफेडीची व त्यावरील व्याजाची शासन हमी घेण्याचा प्रस्ताव राज्य शासनास पाठविण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणामार्फत टोल आकारण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनास पाठविण्यास व सदर प्रकल्प कर्जाची परतफेड टोल, जाहिरात, इत्यादी प्रकल्प उत्पन्नातून करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"त्यापुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठाणे ते बोरीवली पर्यंत भुयारी मार्गाचे बांधकाम प्रकल्पाकरीता निधी उभारण्यासाठी बँका / वित्तीय संस्था यांजकडून कर्ज घेण्यासंबंधीची आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**"त्यापुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : प्राधिकरणाच्या मेट्रो प्रकल्पांसाठी मे.आर.ई.सी. लिमिटेड यांजकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या Scheme - १ साठी शुद्धीपत्रक (Corrigendum) तसेच Scheme-२ कर्जाच्या व्याजदरास व पुरक (Supplementary) करारनामा करण्यास मंजूरी मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६७० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मे.आर.ई.सी. लिमिटेड यांस बरोबर दि.२०/१०/२०२२ रोजी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये, तसेच मे.आर.ई.सी. लिमिटेड यांचे दि.२७/०५/२०२२ रोजीच्या कर्ज मंजुरी पत्रामध्ये, मे.आर.ई.सी. लिमिटेड यांच्या दि.१३/०९/२०२३ रोजीच्या पत्राच्या मंजुरी नुसार मे.आर.ई.सी. लिमिटेड यांचे मार्फत शुद्धीपत्रकाद्वारे (Corrigendum) सुधारणा करून Scheme—१ नुसार कर्ज रक्कम रु.१३,९०६ कोटी विद्युत-तांत्रिक, विद्युत-तांत्रिक व्यतिरीक्त व इतर स्थापत्य कामासाठी एकत्रित रित्या प्राधिकरणाच्या ८ मेट्रो प्रकल्पांसाठी (मेट्रो लाईन ४, २B, ४A, ५, ६, ९, १०, १२) घेण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** मे.आर.ई.सी. लिमिटेड यांचे दि.१३/०९/२०२३ रोजीच्या पत्राच्या मंजुरीनुसार Scheme - २ कर्ज रक्कम रु.१६,६८७ कोटी इतकी प्राधिकरणाच्या ८ मेट्रो प्रकल्पांसाठी (मेट्रो लाईन ४, २B, ४A, ५, ६, ९, १०, १२) सर्व विद्युत-तांत्रिक, विद्युत-तांत्रिक व्यतिरीक्त व इतर स्थापत्य कामासाठी एकत्रित रित्या ५ Year AAA Corporate Bond (Presently ७.५६५% as on ०१.०८.२०२३) yield plus ९३.५ bps (Total ८.५०% presently) on the date of disbursement on monthly rest and annual reset without floor rate या व्याजदराप्रमाणे कर्ज घेण्यास मंजुरी देण्यात येत आहे. त्यासाठी मे.आर.ई.सी. लिमिटेड यांच्या सोबत पुरक करारनामा (Supplementary) करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

"**पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी व आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१६ : प्राधिकरणाच्या प्रकल्पांच्या उभारणीसाठी बँकेंकडून मुदत ठेवींवर अधिकर्ष (Over Draft) घेण्याबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६७१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ कलम २१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी निधीच्या आवश्यकतेनुसार मुदत ठेवींचा व्याजदर अधिक @ ०.५% या दराने रु.१००० कोटी पर्यंत अधिकर्ष सवलत (Overdraft) घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.१७ : प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पांसाठी निधी उभारणीकरीता भारतीय स्टेट बँकेंकडून कॉर्पोरेट कर्ज सुविधा (Corporate Loan Facility) घेण्याबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६७२:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार प्राधिकरणाच्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी भारतीय स्टेट बँक, विदेश व्यापार शाखा यांजकडून रु.२००० कोटी इतक्या रक्कमेचे कॉर्पोरेट कर्ज बँकेच्या ३M MCLR+ spread of ०% p.a. applicable as on the date of first disbursement of CTL (present effective rate of ८.९५% p.a.) payable on monthly basis या व्याज दराने त्यांचे पत्र दि.०७.०८.२०२३ अन्वये सुधारित अटी व शर्तीनुसार घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर कॉर्पोरेट कर्ज घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही व अंमलबजावणी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाच्या प्रकल्पासाठी निधीची आवश्यकता असल्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१ मधील तरतूदी अंतर्गत शासनाने मंजूर केलेल्या मर्यादेपर्यंत कर्ज उभारण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना देण्यात येत आहे."

**बाब क्र.१८ : मुंबई मेट्रो टप्पा-४,४अ, १० व ११ या मेट्रो मार्गिकेच्या कारशेडकरीता व इतर अनुषंगिक कामासाठी मौजे. मोघरपाडा, तालुका-जिल्हा ठाणे येथील स.नं. ३० या मिळकतीपैकी अधिकृत शेतकऱ्यांना २२.५% व अतिक्रमण केलेल्या शेतकऱ्यांना १२.५% विकसित जमिनीचा मोबदला प्राधिकारणामार्फत देणेकरीता भूखंडाचे वाटप करण्याबाबतच्या योजनेस कायोत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**<u>ठराव क्र.१६७३ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोट कलम (क), (ड), (इ) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरणाद्वारे, एकात्मिक कारशेड डेपोकरीता व इतर अनुषंगिक कामासाठी मौजे. मोघरपाडा, तालुका-जिल्हा ठाणे येथील स.नं. ३० या मिळकती पैकी दि. १६/१०/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत पात्र करण्यात येणाऱ्या अधिकृत शेतकऱ्यांना २२.५% व अतिक्रमण केलेल्या शेतकऱ्यांना १२.५% विकसित भुखंड प्राधिकारणामार्फत वाटप करण्याबाबतच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** तसेच वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार वेळोवेळी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासही महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात आली".

**बाब क्र.१९ : ठाणे जिल्ह्यातील प्राधिकरणाच्या अखत्यारीतील विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमित करणेकरिता प्रस्ताव स्वीकारण्याच्या मुदतीत वाढ करण्यासाठी कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६७४:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उप कलम १ चे पोट कलम (क) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे अनधिकृत बांधकामे नियमित करणेकरीता सर्व कागदपत्रांसहीत प्रस्ताव स्वीकारण्याची मुदत दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत वाढविण्यासाठी व प्राप्त प्रस्तावांवर कार्यवाही करणेची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत करण्यासाठी, तसेच या वाढीव कालावधीत प्राप्त सर्व प्रस्तावांस दंडात्मक शुल्कावर ५% सवलत अनुज्ञेय करण्यासाठी मा.मुख्यमंत्री व मंत्री, नगर विकास तथा अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी दिलेल्या मान्यतेनुसार महानगर आयुक्त यांनी दिनांक ०६ जुलै, २०२३ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकास व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीस याद्वारे कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** अनधिकृत बांधकामे नियमित करणेकरीता सर्व कागदपत्रांसहीत प्रस्ताव स्वीकारण्याची मुदत पुढे आणखी तीन महिन्यांकरिता म्हणजेच दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत वाढविण्यासाठी तसेच या वाढीव कालावधीत प्राप्त सर्व प्रस्तावांस दंडात्मक शुल्कावर ५% सवलत अनुज्ञेय करण्यासाठी याद्वारे मान्यता देत आहे. प्राधिकरणाच्या दिनांक ११ मार्च, २०२२ रोजीच्या परिपत्रकामध्ये प्रस्ताव स्वीकारण्याची मुदत व प्रोत्साहनात्मक सवलत याव्यतिरिक्त कोणताही बदल प्रस्तावित नाही.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** याप्रकरणी पुढे गरज भासल्यास महानगर आयुक्तांच्या अहवालानुसार नियमितीकरण धोरणांतर्गत प्रस्ताव स्वीकारण्याच्या मुदतीत आवश्यकतेनुसार वाढ करण्यासाठी अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण व वरील अनुषंगाने आवश्यकतेनुसार वेळोवेळी आवश्यकती पुढील सर्व कायर्वाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास याद्वारे मान्यता देत आहे.

**बाब क्र. २० : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत डोंबिवली व भिवंडी शहराला जोडणा-या माणकोली - मोटागाव जोडरस्ता व राष्ट्रीय महामार्ग दरम्यान तयार होणाऱ्या जंक्शनवर भुयारी वाहन मार्ग (इंटरचेज) बांधण्याच्या कामासाठीच्या रु. ५७.६७ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणे.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६७५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम (१) चे पोटकलम (ग) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत माणकोली मोटागांव जोडरस्ता व राष्ट्रीय महामार्ग दरम्यान तयार होणाऱ्या भुयारी वाहन मार्ग बांधण्यासाठी रक्कम ₹.५७.६७ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करणे तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करणे यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.२१ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मुरबाड रोड, बदलापुर रोड व पुना लिंक रोड यांना जोडणारा वालधुनी नदीस समांतर असलेला विकास आराखड्यातील २४ मी. रूंद रस्ता व त्यावरील दोन रेल्वे उड्डाणपुल (आर.ओ. बी.) विकसीत करण्याकरिता रु.६४२.९८ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६७६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ चे उपकलम, (१) व (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या सर्व अधिकारांचा वापर करुन विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मुरबाड रोड, बदलापुर रोड व पुना लिंक रोड यांना जोडणारा वालधुनी नदीस समांतर असलेला विकास आराखड्यातील २४ मी. रूंद रस्ता

व त्यावरील दोन रेल्वे उड्डाणपुल (आर.ओ. बी.) विकसीत करणेच्या कामास प्रत्यक्ष कामाचा खर्च, इतर आवश्यक बाबी व सर्व करांसहित एकूण रक्कम रु. ६४२,९७,४२,४२२/- (रुपये सहाशे बेचाळीस कोटी सत्त्याण्णव लाख बेचाळीस हजार चारशे बावीस फक्त) इतक्या अंदाजित रक्कमेस प्रशासकीय मान्यता देत आहे व या व्यतिरिक्त भविष्यात येणा-या मेट्रो लाईनमुळे होणा-या वाढीव खर्चास महानगर आयुक्त यांना अधिकार प्राधीकृत करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.२२ : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कर्जत ते हाळफाटा (जुना) राज्य महामार्ग क्र.३५ रस्ता व पुलांचे रुंदीकरण (२+२ मार्गिका) करणे या कामासाठी करण्यात आलेल्या भुसंपादनाची अंदाजे रु.१०० कोटी रक्कम अदा करण्यास मान्यता देणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६७७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९४७ च्या कलम १६ चे उपकलम (१) चे पोटकलम (ग) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन विस्तारित मुंबई पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत कर्जत ते हाळफाटा (जुना) राज्यमार्ग ३५ च्या भुसंपादन करण्याकामी संबंधीत उप अधिक्षक, भुमी अभिलेख यांचेकडील संयुक्त मोजणी नुसार अंतिम होणाऱ्या क्षेत्राच्या अधिन राहून येणारी मुल्यांकन रक्कम अंदाजे ₹ १०० कोटी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२३ : बोरीवली — गोराई रस्त्यावर, गोराई खाडीवर पूल बांधणे व पोहोच रस्त्याची रुंदीकरण, रस्त्याची सुधारणा करणे या कामाकरीता वाढीव किंमतीस सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेकरीता.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६७८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** गोराई रस्त्यावर, गोराई खाडीवर पूल बांधणे व पोहोच रस्त्याचे रुंदिकरण, रस्त्याची सुधारणा करणे हा प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विविध टप्प्यांमध्ये राबविण्यात येणारा मुंबई सागरी किनारा मार्ग (Mumbai Coastal Road Project) या प्रकल्पाशी संबंधित असून मुंबई सागरी किनारा मार्गाशी सदर खाडी पुलाची उचित जोडणी करणे व दोन्ही प्रकल्पांमध्ये समन्वय साधण्याची आवश्यकता विचारात घेता, सदर प्रकल्पाची एकसंध व जलदगतीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प प्राधिकरणाऐवजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेला कळविण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाच्या अनुषंगाने पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.२४ : ठाणे शहरातील रायलादेवी तलावाचे सुशोभिकरण करणेच्या कामासाठी रु.६०.२४ कोटी इतक्या रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६७९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (ड) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील नागरिकांचे सोयीसाठी ठाणे शहरातील रायलादेवी तलावाचे सुशोभिकरण करणेच्या कामासाठी रू.६०.२४ कोटी (रूपये साठ कोटी चोविस लक्ष फक्त) अंदाजपत्रकीय रक्कमेच्या प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. २५ : ठाणे घोडबंदर (कापूरबावडी ते गायमुख) मुख्य रस्त्याचे सेवा रस्त्यांसह विलीनीकरण करुन कॉंक्रिटीकरण करणेच्या कामासाठीच्या रु. ५५९.२७ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६८० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोट कलम (ड) व (ठ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याव्दारे ठाणे घोडबंदर (कापूरबावडी ते गायमुख) मुख्य रस्त्याचे सेवा रस्त्यांसह विलीनीकरण करुन कॉंक्रिटीकरण करणेच्या कामासाठीच्या रु. ५५९.२७ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील फेरबदलासह सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२६ : प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पाअतंर्गत आवश्यक असणाऱ्या खाजगी जमिनधारकांना वाजवी मोबदला देण्यासाठी मूल्यांकन समितीची स्थापना करणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६८१ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** सर्व उन्नत मार्गिकेसाठी आवश्यक असणाऱ्या खाजगी जमीनीच्या अधिग्रहणाची निकड पहाता त्या जमीन धारकांच्या जमिनीचा वाजवी मोबदला निश्चित करणेकरिता मूल्यांकन समितीच्या अध्यक्षपदी अन्य अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत."

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** अंमलबजावणी व या विषयाशी निगडित सर्व निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्रा. यांना देण्यात येण्याच्या ठरावास मान्यता देण्यात येत आहे."

**बाब क्र. २७ : मेट्रो मार्ग २ब डि. एन. नगर ते मंडाळे या मेट्रो मार्गिकेतील नॅशनल कॉलेज मेट्रो स्थानक वगळण्यासाठी मंजूरी देणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६८२ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क) (ड) (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे नॅशनल कॉलेज मेट्रो स्थानक हे मेट्रो स्थानक मेट्रो मार्ग २ब डि.एन. नगर ते मंडाळे प्रकल्पाच्या मुळ संरेखनामधून वगळण्यास मान्यता देण्यात येत आहे.

" **असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत."

**बाब क्र.२८ : मेट्रो मार्ग -१२ (कल्याण-तळोजा) या प्रकल्पा करीता प्रस्तावित मेट्रो कार डेपोचे बांधकाम पिसार्वे येथे करण्याऐवजी निळजेगाव येथील शासकीय जमिनीवर करण्याबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६८३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १२ चे उप कलम (१) चे पोट कलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि या बाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, मेट्रो मार्ग -१२ (कल्याण-तळोजा) या प्रकल्पाकरीता प्रस्तावित मेट्रो कार डेपो आणि संबंधित उपक्रमांसाठी चे बांधकाम पिसार्वे येथे करण्याऐवजी निळजे गाव ता. कल्याण, जि. ठाणे येथील आवश्यक असलेल्या एकूण ६३.५५ हेक्टर (५२.५२ हे. शासकीय + ११.०३ हे. खाजगी) जमिनीचे भूसंपादन करून मेट्रो कारडेपो आणि संबंधित उपक्रम यांचे बांधकाम करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. २९ : मेट्रो मार्ग ९, ७ व ७अ या प्रकल्पाकरिता एकात्मिक प्रस्तावित मेट्रो कार डेपोचे बांधकाम राई, मुर्धे येथे करण्याऐवजी मौजे डोंगरी येथील शासकीय व अंशतः खाजगी जमिनीवर करण्याबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६८४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, मेट्रो मार्ग ९, ७ व ७अ प्रकल्पाकरिता एकात्मिक प्रस्तावित मेट्रो कारडेपोचे बांधकाम राई, मूर्धे येथे करण्याऐवजी मौजे डोंगरी येथील शासकीय व अंशतः खाजगी जमिनीवर करण्यास मान्यता देत आहे. तसेच मौजे डोंगरी येथील जागेत बांधण्यासाठीचा लागणारा अतिरिक्त एकूण ₹ २,०६१ कोटी खर्चासही मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.३० : मेट्रो मार्ग-४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासरवडवली या मेट्रो मार्गिकेतील सुमन नगर मेट्रो स्थानक व अमर महल मेट्रो स्थानक वगळण्यासाठी मंजुरी देणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६८५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण समिती याद्वारे मेट्रो मार्ग-४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासरवडवली या मेट्रो

मार्गिकेतील सुमन नगर स्थानक व अमर महल जंक्शन स्थानक वगळण्यास संभाव्य आर्थिक बदलांसह मान्यता देत येत आहे व मेट्रो मार्ग ४ चे सिद्धार्थ कॉलनी स्थानक आणि मेट्रो मार्ग २ च्या इ.इ.एच स्थानकांचे एकत्रीकरणाच्या योजनेस संभाव्य आर्थिक बदलांसह मान्यता देत येत आहे.

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.३१ : महा मुंबई मेट्रो (एम ३) संचलन महामंडळ मर्यादीत संस्थेच्या संचलन आणि देखभाल खर्चाकरीता निधी उभारण्याबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६८६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, महा मुंबई मेट्रो (एम ३) संचलन महामंडळामध्ये अधिकृत भाग भांडवल रुपये ५/- कोटी (रुपये पाच कोटी) वरुन रुपये १५५/- कोटी (रुपये एकशे पंचावन्न कोटी) इतक्या वाढीस मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** समभाग रुपये १५० कोटींपैकी रुपये ७५ कोटी रक्कम (दिनांक २५.११.२०२३ रुपये २५ कोटी व दिनांक २६.११.२०२३ रोजी ५० कोटी) प्रदान करण्यात आली असून, त्याकरीता कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. तसेच उर्वरीत रक्कमेची महा मुंबई मेट्रो (एम ३) महामंडळ मर्यादित यांच्या विनंतीनुसार हक्क समभागापोटी वितरीत करण्याबाबत मंजूरी देण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** तसेच यापूढे महामंडळास आवश्यकते प्रमाणे समभागापोटी रक्कम देण्याचे अधिकार महानगर आयुक्त मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** यासाठी आवश्यक असणाऱ्या स्वाक्षरी, प्रमाणीकरण, वाटप, देकार पत्राची अंमलबजावणी, आवेदन पत्र आणि तत्सम इतर गोष्टींसाठी महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

“**पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** यासाठी आवश्यक असणारे अधिकार भाग, प्रचालन व जबाबदारी यांसाठी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामधील अधिकारी वा व्यक्ती यांची सदस्यत्व घेण्यासाठी नियुक्ती करणे यासाठी महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.३२ : प्राधिकरणामध्ये भारतीय प्रशासकीय सेवेतील एक अधिकारी अतिरिक्त महानगर आयुक्त व एक अधिकारी सह महानगर आयुक्त या पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्याची शासनास शिफारस करण्याच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६८७ :**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे उपकलम (१) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरणाच्या आस्थापनेवर भारतीय प्रशासन सेवेतील सुपर टाईम स्केलमधील एका अधिकाऱ्याची अतिरिक्त महानगर आयुक्त म्हणून तसेच वेतनस्तर एस-३१ मधील एका अधिकाऱ्याची सह महानगर आयुक्त म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याची शासनास शिफारस करण्याच्या प्रस्तावास याद्वारे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

“**असाही ठराव करण्यात येत आहे की,** राज्य शासनाद्वारे वरीलप्रमाणे नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांच्या अधिकारकक्षा, त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्याचे अधिकार याद्वारे महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.”

**बाब क्र.३३ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल १ जानेवारी, २०२३ ते दि. ३० जून, २०२३.**

दिनांक १ जानेवारी, २०२३ ते दि. ३० जून, २०२३ या कालावधीत केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३४ : सन २०२२-२०२३ या वर्षाचे प्राधिकरणाचे लेखे**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६८८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वित्तीय) विनियम, १९७६ नियम १३ (फ) अन्वयें प्राधिकरणाचे सन २०२२-२३ या वर्षाचे सर्व निधीचे लेखे संमत करण्यात येत आहेत. प्राधिकरणाचे सन २०२२-२३ या वर्षाचे आयकर विवरणपत्र विश्वस्थ संस्था म्हणून आयकर कार्यालयाकडे सादर करण्यास व आयकर कलम ११ नुसार कार्यवाही करण्यास तसेच प्राधिकरणाने विविध प्रकल्पावर केलेल्या खर्चामधून प्राधिकरणाची कोणतीही मालमत्ता तयार होत नसल्यामुळे प्रकल्पावरील झालेला खर्च महसूली खर्च म्हणून लेख्यामध्ये दाखविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** ठरावाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत."

**बाब क्र.३५ : प्राधिकरणाचा सन २०२२-२३ चा वार्षिक अहवाल.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६८९:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन २०२२-२०२३ च्या वार्षिक अहवालास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे व हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.३६ : बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील "विशेष विकास क्षेत्र" (Special Development Zone) पैकी मुंबईच्या पश्चिम उपनगरातील आकसे, दारवली, ऐरंगल, मढ, मालवणी व मार्वे या गावांमधील अंदाजे १३८६.८५हेक्टर क्षेत्रासाठी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याबाबत शासनास विनंती करण्यास व त्यानंतर सदर क्षेत्राचा विकास आराखडा करण्याबाबतची सर्व कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

सदर विषयाबाबत विचारविनिमय करण्याचे लांबणीवर टाकण्याचे आदेशित केले.

**बाब क्र.३७: राष्ट्रीय महामार्ग-३ वर ठाणे ते पडघा दरम्यान उन्नत मार्गाची अंमलबजावणी करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करणे.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**<u>ठराव क्र.१६९० :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे राष्ट्रीय महामार्ग-३ वर ठाणे ते पडघा दरम्यान उन्नत मार्गाची अंमलबजावणी करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढिल सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.३८ : मेट्रो मार्ग-५चा विस्तार (कल्याण ते उल्हासनगरपर्यंत) योग्य त्या Transit System द्वारे करण्याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन मान्यता, अंमलबजावणी व या विषयाशी निगडित सर्व निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्रा. व मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना देण्याबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**<u>ठराव क्र.१६९१ :</u>**

**"असा ठराव करण्यात येतो की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वरील पर्यायांची सल्लागारामार्फत सखोल तांत्रिक सुसाध्यता तपासून योग्य त्या पर्यायाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन मान्यता, अंमलबजावणी व या विषयाशी निगडित सर्व निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, मुं.म.प्र.वि.प्रा. यांना देण्यात येण्याच्या ठरावास मान्यता देण्यात येत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.३९ : ठाणे शहरातील मासुंदा तलावाचे सुशोभिकरण करण्याच्या कामासाठीच्या रु.६० कोटी इतक्या अंदाजित रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

चर्चेनंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजुर केला :-

**ठराव क्र.१६९२ :**

**“असा ठराव करण्यात येते आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (३) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील नागरिकांचे सोयीसाठी ठाणे शहरातील मासुंदा तलावाचे सुशोभिकरण करणेच्या कामासाठी ₹.६०.०० कोटी (रुपये साठ कोटी फक्त) अंदाजपत्रकीय रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे”.

त्यानंतर, माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*************